## सर्व शिक्षा अभियान-सोलापूर जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

- भौतिक लक्ष व आर्थिक लक्ष साध्य करण्यामध्ये महाराष्ट्रात सर्व प्रथम.
- केवळ भौतिक लक्ष नव्हे तर गुणवत्तेसाठी पूरक उपक्रमांच्या कार्यवाहीवर आधारीत कामगिरीचे मूल्यमापन.
- विद्यार्थी गळतीचे प्रमाण कमी.
- मुलींचे गळतीचे प्रमाण कमी.
- बांधकाम उपक्रमांतर्गत जास्तीत जास्त बांधकामे पूर्ण.
- पर्यायी शिक्षण योजनेअंतर्गत जास्तीत जास्त शाळाबाह्य मुले शाळेच्या प्रवाहात दाखल.
- अल्पसंख्यांकांच्या योजनांची १००% उद्दिष्टपूर्ती करणारा; राज्यातील एकमेव जिल्हा.
- अपंग समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत विद्यार्थी शस्त्रक्रियेमध्ये सोलापूर जिल्हा महाराष्ट्रात प्रथम.
- सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रज्ञाचक्षू शाळा वाचनालय.
- सर्व जि.प. शाळा NBT India चे अजिवन सभासद. असा उपक्रम असणारा सोलापूर हा भारतातील एकमेव व पहिला जिल्हा आहे.
- सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये अग्निपंख प्रयोगशाळा.
- सर्व १९९ केंद्र शाळांना अंतरराष्ट्रीय दर्जाच्या टेलिस्कोप, मायक्रोस्कोप, मानवी शरीराचा सांगाडा प्रतिकृती व तापमापी.

## सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यान्वित उपक्रम

१. गटसाधन केंद्र
२. समुह साधन केंद्र
३. बांधकाम
४. शाळाबाहय मुलांचे शिक्षण (पर्यायी शिक्षण योजना)
५. मोफत पाठयपुस्तके.
६. नाविन्यपूर्ण उपक्रम (पूर्व प्राथमिक शिक्षण, मुलींचे शिक्षण, अनु. जाती, जमाती शिक्षण, संगणक शिक्षण)
७. अपंग एकात्मिक शिक्षण.
८. शाळा अनुदान
९. शिक्षक अनुदान
१०. शाळा देखभाल दुरुस्ती अनुदान.
११. प्राथमिक शिक्षक वेतन (रिकरींग)
१२. अध्ययन अध्यापन शैक्षणिक साहित्य अनुदान.
१३. व्यवस्थापन व इतर
१४. संशोधन व मूल्यमापन
१५. नवीन प्राथमिक शाळा.
१६. शिक्षक प्रशिक्षण
१७. लोकप्रतिनिधींचे प्रशिक्षण.

## नवीन प्राथमिक शाळा

सन २००८-०९ मधील १५६ वस्तीशाळा नियमित शाळेत रूपांतरीत झाल्या. या शाळांमधील सर्व स्वयंसेवकांना निमशिक्षक या पदावर कंत्राटी पद्धतीने १० महिने कालावधीचे आदेश देण्यात आले. या सर्व शाळा नियमित शाळांप्रमाणे कार्यान्वित आहेत. आजवर ३७५ वस्तीशाळा नियमित शाळेत रूपांतरीत झालेल्या आहेत. अशा प्रकारे कार्यवाही करणारा सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्रात एकमेव जिल्हा आहे.

## शिक्षक अनुदान सन २००८-०९

प्रति शिक्षक रु. ५००/- इतके अनुदान वितरीत केले आहे. या शिक्षक अनुदानातून शाळास्तरावर दैनंदिन अध्यापनात आवश्यक विविध शैक्षणिक साहित्य शिक्षकांनी तयार केलेले आहे. काही तयार साहित्यही या अनुदानातून शिक्षकांनी खरेदी करुन त्याचाही वापर दैनंदिन अध्यापनात करण्याचा प्रयत्न होत आहे.

## गट साधन केंद्र

जिल्हा स्तरावरुन दिलेल्या नियोजनानुसार गट साधन केंद्रामार्फत पुढील कार्यवाही झाली.

१) प्रत्यक्ष शिक्षकांच्या अध्यापनाचे पाठ निरीक्षण.
२) विविध उपक्रम सनियंत्रण :- सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम, अग्निपंख प्रयोगशाळा, प्रज्ञाचक्षू शाळा वाचनालय, इ.
३) विविध परीक्षा आयोजन :- प्रज्ञाशोध परीक्षा, शिक्षक समृद्धी परीक्षा, नियमित परीक्षा, उजळणी चाचणी, शिष्यवृत्ती व इतर स्पर्धात्मक परीक्षा,

## समूह साधन केंद्र

**समूह साधन केंद्रा मार्फत झालेली कार्यवाही**

❖ शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा.
❖ केंद्रस्तरावर प्रशिक्षण :- नवीन अभ्यासक्रम, मुख्याध्यापक प्रशिक्षण, लोकप्रतिनिधी प्रशिक्षण, अपंग समावेशित शिक्षण, मुलींसाठी योग प्रशिक्षण कराटे प्रशिक्षण.
❖ ग्राम शिक्षण समिती व ग्राम सभा उपस्थिती व मार्गदर्शन.
❖ अपंगांचे शिक्षण, मुलींचे शिक्षण, पर्यायी शिक्षण या अंतर्गत मिळणारे सर्व लाभ संबंधीत लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न झाले.

## शिक्षक प्रशिक्षण

राज्य स्तरावरून सुचविण्यात आलेले प्रशिक्षण पूर्ण होऊन देखील १००% शिक्षकांचे प्रत्येकी २० दिवसाचे प्रशिक्षण घेण्याचे भौतिक उद्‌दिष्ट साध्य न झाल्याने जिल्हास्तरावरून गरजाधिष्टीत प्रशिक्षणास SCERT ची मान्यता घेऊन पुढील प्रमाणे प्रशिक्षण आयोजित केल्याने शिक्षक प्रशिक्षण या उपक्रमाचे १००% भौतिक व आर्थिक उद्दिष्ट साध्य झाले.

## जिल्हास्तरावरुन स्थानिक गरजाधिष्टीत प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत आयोजित प्रशिक्षण

१. इ.५ वी ते ७ वी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सेमी इंग्रजी विषय शिक्षकांसाठी गणित व विज्ञान विषय शिक्षकांची प्रशिक्षण
२. इ.४ थी व इ.७ वी शिष्यवृत्ती परीक्षेस मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांची प्रशिक्षण
३. इ. १ ली ते ४ थी इंग्रजी विषयाचे प्रशिक्षण.
४. योग प्रशिक्षण
५. भूगोल विषयातील कठीण संबोध, संकल्पना व नकाशावाचन याबाबत शिक्षक प्रशिक्षण
६. सेमी इंग्रजी प्रशिक्षण.
७. कृती संशोधन प्रशिक्षण
८. गीतमंच प्रशिक्षण
९. शिक्षक प्रेरणा शिबीर.
१०. संगणक प्रशिक्षण

## शाळाबाह्य मुलांचे शिक्षण

**कार्यरत पर्यायी शिक्षण केंद्र माहिती सन २००८-०९**

**जिल्हा :- सोलापूर (मार्च २००९ अखेर)**

| अक्र | पर्यायी शिक्षण केंद्रे | केंद्र संख्या | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | म.फु. शि. ह. यो. (प्राथ.) | २ | २४ | २८ | ५२ |
| २ | म.फु. शि. ह. यो. (हंगामी) | ३६ | ४४५ | ३७८ | ८२३ |
| ३ | सेतु शाळा ( अनिवासी ) | २ | १५ | २० | ३५ |
| ४ | राजीव गांधी संधी शाळा | ९७ | १११ | ९५ | २०६ |
| ५ | हंगामी वसतीगृह | ३६ | ७३७ | ६५२ | १३८९ |
| ६ | मदरसा मकतब | ५१ | ४७९ | ४२९ | ९०८ |
| | एकूण :- | २२४ | १८११ | १६०२ | ३४१३ |

या योजने अंतर्गत सन ०८-०९ मध्ये ५१ नवीन मदरसा केंद्रांना मंजूरी देण्यात आली आहे.

## सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षातील गैरहजर विद्यार्थी शोध कार्यक्रम

शैक्षणिक वर्ष सन २००७-०८ मध्ये उजळणी मूल्यमापन चाचणी व विविध चाचण्या, तसेच सत्र परीक्षेत काही विद्यार्थी गैरहजर असल्याचे निकालावरुन आढळून आले. तसेच ३० सप्टेंबर २००७ च्या शिक्षक निश्चिती पट व ३० एप्रिल २००८ चा जिल्हयाचा पट, या बाबींचा विचार करता बरेच विद्यार्थी नियमित अथवा अधून मधून शाळेस गैरहजर राहतात असे दिसून आले आहे.

या सर्व बाबींचा नेमका शोध घेण्यासाठी विविध प्रकारची ६ प्रपत्रे जिल्हास्तरावर विकसित केली गेली.

प्रपत्र १ :- परीक्षेस गैरहजर विदयार्थी शोध पत्रिका
प्रपत्र २ :- अधून मधून नियमित गैरहजर विदयार्थी
प्रपत्र ३ :- ३० सप्टें २००७ ते ३० एप्रिल २००८ पर्यंत पटावरून नाव कमी केलेले विदयार्थी.
प्रपत्र ४ :- शाळाबाहय विदयार्थी शोधपत्रिका
प्रपत्र ५ :- १४ वर्ष पुर्ण केलेले शाळाबाहय विदयार्थी
प्रपत्र ६ :- जून २००८ पासून सतत गैरहजर विदयार्थी माहिती

दि. १४/७/०८ ते २४/७/०८ या १० दिवसामध्ये जिल्हयातील सर्व जिल्हा परिषद शाळांतून या अनुषंगाने प्रत्यक्ष शाळाभेटीतून माहिती संकलित केली.

दि. २५/७/०८ रोजी जिल्हास्तरावर ही माहिती एकत्रित केली. सद्या या विषयावर विश्लेषणाचे काम चालू आहे. जिल्हास्तरावर या २५६०७ विद्यार्थ्यांची नावांची कारण निहाय यादी उपलब्ध आहे. या यादीवरुन प्राथमिक निरिक्षणातून आढळून आलेल्या बाबींवरून पुढील उपाययोजना केली.

१. परीक्षेत गैरहजर मुले, अधून मधून गैरहजर मुले, जून २००८ पासून गैरहजर मुले यांच्या मध्ये नावाची पुनरावृत्ती झाली आहे.
२. नावे कमी केलेल्या विद्यार्थ्यांची कारण निहाय विश्लेषण केले.
३. अधून मधून गैरहजर व कायम गैरहजर विद्यार्थी शाळेत नियमित यावेत यासाठी प्रती शिक्षक एक विद्यार्थी दत्तक देऊन सर्व गैरहजर मुलांना नियमित उपस्थित राहण्याबाबतचा उपक्रम हाती घेतले आहेत.
४. शाळाबाहय मुले प्रवाहात सामिल करुन घेणेसाठी पर्यायी शिक्षण शिक्षणाच्या केंद्रामध्ये दाखल केली गेली.
५. स्थलांतरीत विद्यार्थी नेमके कोठे आहेत. या संदर्भात सविस्तर शोध घेऊन ती मुले तिथे शाळेचा प्रवाहात आहेत काय? याची माहिती घेतली.
६. एखादया शाळेत अधिक प्रमाणात मुली/मुले गैरहजर असलेल्या ठिकाणी जिल्हास्तरावरुन अधिकारी, सर्व शिक्षा अभियान जिल्हा समन्वयक, संबंधित शाळा भेट देऊन मुलांना शाळेत उपस्थित ठेवले गेले.

या शोध कार्यक्रमातून सविस्तर विश्लेषणातून आढळलेल्या कारणे व बाबींवरून अधिक उपाययोजना केली.

## मोफत पाठय पुस्तके योजना कार्यवाही सन २००८-०९

सोलापूर जिल्ह्याने बालभारती, पुणे येथून सर्वप्रथम पाठयपुस्तके व स्वाध्याय पुस्तिकांची उचल करून दि. १६/६/०८ रोजी म्हणजेच शाळेच्या पहिल्या दिवशी १००%शाळांमध्ये पाठयपुस्तकांचे वितरण केले.

## मोफत पाठय पुस्तके योजना कार्यवाही सन २००९-१० (इ. १ ली ते ८ वी)

सोलापूर जिल्ह्याने बालभारती, पुणे येथून सर्वप्रथम दि. १३/४/०९ पासून पाठयपुस्तके व स्वाध्याय पुस्तिकांची उचल करून दि. १५/६/०९ रोजी म्हणजेच शाळेच्या पहिल्या दिवशी १००%शाळांमध्ये पाठयपुस्तकांचे वितरण केले.

## अपंग समावेशित शिक्षण

| अ.क्र. | उपक्रम | लाभार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | शोधपत्रिकेव्दारे शोध घेतलेले विद्यार्थी संख्या :- | ६०८२५ |
| २ | तालुका तपासणी :- | २४५०५ |
| ३ | मोजमाप शिबीरात निवडलेले विद्यार्थी :- | ९९७ |
| ४ | शस्त्रक्रियेसाठी निवडलेले विद्यार्थी :- | १९७६ |
| ५ | शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झालेले विद्यार्थी :- | १३८० |
| ६ | चष्मे दिलेले विद्यार्थी संख्या :- | १३०७ |
| ७ | श्रवणयंत्र दिलेले विद्यार्थी :- | ४९७ |
| ८ | व्हिल चेअर दिलेले विद्यार्थी :- | ३६१ |
| ९ | ट्रायसिकल दिलेले विद्यार्थी :- | २१७ |
| १० | कॅलिपर्स दिलेले विद्यार्थी :- | ३०७ |
| ११ | कृत्रिम अंग दिलेले विद्यार्थी :- | १२ |
| १२ | आधारकाठी दिलेले विद्यार्थी :- | ०८ |

या उपक्रमांतर्गत सोलापूर जिल्हयाने महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाची कामगीरी केली आहे.

अपंग समावेशित शिक्षण योजना सन २००५-०६ ते २००८-०९

| अ.नं. | उपक्रम | तपशील | |
|---|---|---|---|
| १ | शोधपत्रिकेनुसार विशेष गरजा असणा-या विद्यार्थ्यांचा शाळास्तरावर शोध | प्राथमिक शिक्षकांनी शोधलेले विद्यार्थी - ६६४१० | |
| २ | प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर तपासणी | तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या - ५६४४४ | |
| ३ | तालुकास्तरावर वैद्यकीय तपासणी | तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या - ३४४६४<br>अपंगत्व प्रमाणपत्र दिलेले विद्यार्थी संख्या - ५२५५ | |
| ४ | दृष्टीदोष असणा-या विद्यार्थ्याचा शस्त्रक्रियेसाठी एच.व्ही.देसाई नेत्र रूग्णालय पुणे यांचे तर्फे तपासणी व शस्त्रक्रिया | ६२२ पैकी ४५० नेत्र शस्त्रक्रिया पूर्ण, १६५५ विद्यार्थ्यांना चष्मे वाटप | |
| ५ | अस्थिव्यंग असणा-या विद्यार्थ्यांना साहित्य देणेसाठी मोजमाप शिबीर (ALIMCO INDIA) | व्हीलचेअर - ४४५ | कॅलीपर्स - ४३६ |
| | | ट्रायसिकल - ३०६ | कृत्रीम अंग - २३ |
| | | कुबडी - ११४ | आधार काठी - ९ |
| ६ | अस्थिव्यंग, कर्णबधीर, वाचादोष असणा-या विद्यार्थ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी शासकिय व खाजगी येथे तपासणी शिबीर व शस्त्रक्रिया | शस्त्रक्रियेची अपेक्षित संख्या<br>नेत्रदोष - ६२२<br>वाचादोष - ४६८<br>कर्णदोष - २४५<br>अस्थिव्यंग - १६४३<br>(उवरीत शस्त्रक्रिया सुरू आहेत) | शस्त्रक्रिया झालेली संख्या<br>नंत्रदोष - ४५०<br>वाचादोष - २४६<br>कर्णदोष - १०१<br>अस्थिव्यंग -५७८<br>एकुण :- १३७५ |
| | | एकुण १३७५ विद्यार्थ्यांच्या १७५२ शस्त्रक्रिया | |
| ७ | कणूबधीर विद्यार्थ्यांना श्रवणयंत्र (Audiometry) | ७६० विद्यार्थ्यांचे Audiometry करण्यात आली .<br>५४० विद्यार्थ्यांना श्रवण यंत्राचे वाटप. | |
| ८ | अध्ययन अक्षम व मतिमंद विद्यार्थ्यांचे आय.क्यू टेस्टिंग शिबिर | ८३० विद्यार्थ्यांची बुध्दयांक काढण्यात आले. | |
| ९ | अपंग समावेशित शिक्षण पर्यवेक्षिय अधिकारी प्रशिक्षण | जिल्हास्तरीय प्रशिक्षणार्थी :- ७०४<br>तालुकास्तरीय प्रशिक्षणार्थी :- १२२६५ | |

- विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी ४६ विशेष शिक्षकांची नियुक्ती.
- वाचादोष असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकविण्याकरिता १६ मोबाईल टिचरांना स्पिच ट्रेनर मशिनचे वाटप.
- विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी ४६ विशेष शिक्षकांची नियुक्ती .
- शस्त्रक्रियेमध्ये सन २००५-०६ पासून राज्यात प्रथम.
- साहित्य साधनांच्या वाटपामध्ये सन २००५-०६ पासून राज्यात प्रथम
- Community Awarness मध्ये राज्यात प्रथम.
- जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधून शिकणाऱ्या इ. १ ली ते ८ वी च्या हृदयरोग असणाऱ्या ३७८ विद्यार्थ्यांचा शोध घेऊन ११९विद्यार्थ्यांची कलर डॉपलर तपासणी पूर्ण. यापैकी ८३ विद्यार्थ्यांच्या हृदयशस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण. यामध्ये राज्यात प्रथम क्रमांकाची कामगीरी.
- जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या आर्थिक मदतीतून ४ विद्यार्थ्यांवर यशस्वी शस्त्रक्रिया.
- जिल्हास्तरीय शस्त्रक्रिया शिफारस केलेल्या २५८२ पैकी १३७५ विद्यार्थ्यांवर १७५२ शस्त्रक्रिया पूर्ण राज्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी .

## सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम सन २००८-०९

सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत ३४३४ शाळांमधून ५७८१७९ विद्यार्थ्यांची शालेय आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३९९८ किरकोळ आजार असणाऱ्या विद्यार्थ्यांना औषधोपचार देण्यात आला. ५९१३ विद्यार्थ्यांना तपासणी पथकाकडून तालुकास्तरावर ग्रामीण रूग्णालयात संदर्भित करण्यात आलेले आहे. उर्वरीत जिल्ह्यातील १००% शाळांची तपासणी पूर्ण.

## निवासी सेतूशाळा अभ्यासक्रम अंमलबजावणी -

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नुसार विशेष गरज असणाऱ्या मुलांना शिक्षण देणे धोरणात्मक निर्णयानुसार ५० शाळाबाहय, अपंग विद्यार्थ्यासाठी पूर्व कौशल्य प्रशिक्षण प्रकल्पांतर्गत गटसाधन केंद्र कुर्डूवाडी या ठिकाणी ५० शाळाबाह्य अपंग विद्यार्थ्यांसाठी ९० दिवसीय निवासी स्वरूपाचे सेतूशाळा उपक्रम यशस्वी झाला. या सेतूशाळेत १० मोबाईल टिचर मार्फत अपंगांना होमबेस एज्युकेशन देण्यात आले.

## बांधकाम

- सन २००८-०९ मध्ये मागील बांधकाम Spill Over शून्य आहे.
- २२४ नवीन प्राथ. शाळा बांधकामांपैकी १२८ शाळा बांधकामे पूर्ण झाली असून ९६ कामे प्रगती पथावर आहेत.
- अतिरिक्त खोल्या बांधकामांपैकी २ खोल्यांचे बांधकाम पूर्ण झाले
- असून ४८ कामे प्रगतीपथावर आहेत.

## शाळा अनुदान सन २००८-०९

▶ या अनुदानातून शालेय वाचनालय अद्ययावत करण्यासाठी NBT ची पुस्तके खरेदी करणेत आली.

▶ प्रत्येक शाळेस इंग्रजी वर्तमानपत्र सुरू करण्यात आले. वर्तमानपत्र स्टँड.

## संशोधन व मूल्यमापन :-

नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया (NBT) यांचे मार्फत जिल्ह्यात २२ ठिकाणी पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले व त्यामधून जिल्ह्यातील सर्व शाळांनी उपलब्ध अनुदानातून शाळांसाठी पुस्तके खरेदी केली. सन २००८-०९ मध्ये जिल्हास्तरावरील दोन संशोधन प्रकल्पांची IGNOU DEEP SSA नवी दिल्ली यांचे वतीने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील चर्चा सत्रासाठी निवड झाली आहे.

सोलापूर हा देशातील एकमेव असा जिल्हा आहे जेथे जिल्हा परिषदेच्या १००% शाळा NBT चे अजिव सभासद झालेले आहेत.

## व्यवस्थापन व गुणवत्ता

**सदर कार्यक्रमामध्ये खालील उपक्रमाचा समावेश आहे.**

| अ.क्र. | उपक्रमाचे नाव | शाळा संख्या |
|---|---|---|
| १) | गणित विषयाची अध्ययन पातळी सुधारणे. इयत्ता १ ली ते ३ री. | २०१ |
| २) | इंग्रजी विषयाची अध्ययन पातळी सुधारणे. इयत्ता १ ली ते ३ री. | २०१ |
| ३) | नंदादीप शाळा . इ. १ ली ते ४ थी. | २०० |
| ४) | वाचन कोपरे. (उच्च प्राथमिक) | ३८ |

## नावीन्यपूर्ण उपक्रम

### पूर्व प्राथमिक शिक्षण

पूर्व प्राथमिक शिक्षण अंतर्गत जिल्हा परिषद, नगरपालिका व आय.सी.डी.एस. च्या ३०७६ अंगणवाडी पर्यवेक्षिका व सेविकांना प्रशिक्षण देण्यात आले तसेच सर्व बालवाडी व अंगणवाडी केंद्रांना खेळ खेळूया पुस्तक वितरण करण्यात आले.

### मुलींचे शिक्षण व एस.सी./एस.टी. मुलांचे शिक्षण

सन २००८-०९ मध्ये नाविन्यपूर्ण उप्रमांतर्गत मुलींचे शिक्षण व एस.सी., एस.टी. मुलांचे शिक्षण या उपक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील सर्व केंद्रशाळा व निवडक उच्च प्राथ. अशा २४९ शाळांना पूरक वाचनाची पुस्तके व स्टीलबुक केस पुरविण्यात आले.

### संगणक शिक्षण

नावीन्यपूर्ण उपक्रम अंतर्गत सोलापूर जिल्हयात एकूण ७३ शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा कार्यान्वित आहेत. जिल्ह्यातील २५२५ जि.प. शिक्षकांना संगणक प्रशिक्षण देण्यात आले. या करिता संगणक शिक्षण -पुस्तक पहिले या मार्गदर्शिकेची निर्मिती केली. या अंतर्गत ग्रामीण भागातील मुलांना संगणक ओळख, संगणक साक्षर करण्यात आले. तसेच विज्ञान, सामाजिक शास्त्र व गणित या विषयांचे आज्ञावली Install करून त्याद्वारे मुले शालेय अभ्यास क्रमाचे अध्यापन करीत आहेत.

### अल्पसंख्यांक योजनांतर्गत राबविण्यात आलेले उपक्रम

१. अल्पसंख्यांक साधन गटाची निर्मिती.
२. अल्पसंख्यांक मुलांसाठी विशेष धोरणांतर्गत पटनोंदणी पंधरवडा.
३. साधन गटा मार्फत उर्दू शाळांना भेटी.
४. जिल्हा अल्पसंख्यांक समन्वयकाची नियुक्ती.

५. मा. मु.का.अ. यांचे मार्फत साधन गटाच्या नियमित बैठका.
६. सर्व जि.प. शिक्षकांचे प्रेरणा शिबीर यात मा. मु.का.अ. यांचे मार्गदर्शन.
७. उर्दू शाळांच्या विविध उल्लेखनिय उपक्रमांची दखल
८. उच्च प्राथमिक उर्दू शाळांना विद्यार्थी वाचनालयासाठी प्रती शाळा रू. ५०००/- अनुदान.
९. खेळ साहित्यासाठी प्रतिशाळा रू. २०००/- अनुदान.
१०. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेस बसलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची परीक्षा फी ची तरतूद.
११. उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तर देण्यासाठी रू. १५०/- प्रमाणे अनुदान.
१२. गणित विषयाचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी सर्व उर्दू शाळांना गणित पेटींचे वितरण.
१३. अल्पसंख्याक शिक्षणातून दोन व संगणक शिक्षणाच्या माध्यमातून एक अशा तीन उर्दू शाळेत संगणक प्रयोगशाळा.
१४. संगणक असलेल्या उर्दू शाळांना शैक्षणिक सी.डी. खरेदी करण्यासाठी प्रतिशाळा रू. १५००/- अनुदान.
१५. उर्दू संगणक प्रयोगशाळांना Discovery School च्या शैक्षणिक सी.डी. चे वाटप.

## मुलींचे शिक्षण - विशेष उपक्रम

**ज्युदो कराटे प्रशिक्षण** :- जिल्हयातील ३३९४ शिक्षिका व ३१५९१ इयत्ता ५ वी ते ७ वी च्या ३१५९१ विद्यार्थीनींना ज्युदो व कराटेचे प्रशिक्षण देण्यात आले.
योग प्रशिक्षण :- जिल्हयातील ३५४२ शिक्षिका व इ. १ ली ते ७ वी च्या १२९२३२ विद्यार्थीनींना योग प्रशिक्षण देण्यात आले.
**मातृगौरव** :- २६ जानेवारी २००७ - प्रजासत्ताक दिना दिवशी गावातील ज्येष्ठ मातांच्या हस्ते २४३३ जिल्हा परिषद शाळांमध्ये ध्वजारोहण झाले आहे. जिल्हयातील सर्व जि.प. शाळांमध्ये या मातृगौरवास १२६८४७ माता पालक उपस्थित होत्या. आजवर प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र दिन मुले सांभाळत चुलीसमोर बसून अनुभवला त्या माता भगिनी, महिलांना इतिहासात प्रथमच गावात ध्वजारोहणाची संधी व सन्मान मिळाला.
मुलींच्या शिक्षणासाठी ग्रामीण भागात हा उपक्रम प्रेरक ठरला आहे.
**ई-भरारी** :- जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षकांना या बदलत्या क्षेत्राची अद्ययावत माहिती होणे आवश्यक आहे, यासाठी ई-भरारी प्रशिक्षण हा कार्यक्रम कार्यान्वित केला. या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शिक्षकांना मोबाईल, संगणक, आयपॉड, सर्व इलेक्ट्रीकल उपकरणे, चॅर्जिंग सेल, प्रिंटर, कॅमेरा, मोबाईल, सी.डी. प्लेअर, व्हीडीओ गेम, टेपरेकॉर्डर, रेडीओ या उपकरणांविषयी सखोल माहिती एक दिवशीय प्रशिक्षणातून देण्यात आली.

## प्राथमिक शिक्षण विभाग जि.प.सोलापूर
## विविध प्रकाशित मार्गदर्शिका

▸ प्रज्ञाचक्षू शाळा वाचनालय उपक्रम, ▸ गीत गुंजन गीत मंच पुस्तिका,
▸ विषयतज्ञ कार्यसूची मार्गदर्शिका, ▸ अग्निपंख प्रयोगशाळा उपक्रम.
▸ मातृगौरव, ▸ योगसाधना, ▸ ई- भरारी, ▸ स्वयंसिद्धा,
▸ मुख्याध्यापक मार्गदर्शिका, ▸ उपचारात्मक अभ्यास स्वयंसेवक मार्गदर्शिका, ▸ अपंग समावेशित
▸ शिक्षण प्रेरणा मार्गदर्शिका, ▸ विशेष शैक्षणिक गरजा असणारे विद्यार्थी मार्गदर्शिका,
▸ भौगोलिक संकल्पना व नकाशा वाचन मार्गदर्शिका, ▸ खेळ खेळूया, ▸ यशोगाथा,
▸ गतिमान वाचन विकसन कौशल्य, ▸ शिक्षक प्रेरणा ▸ संगणक शिक्षण पुस्तक पहिले.

## लोकप्रतिनिधींचे प्रशिक्षण

सर्व शिक्षा अभियानामध्ये लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी जिल्हास्तर ते केंद्रस्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यात आले.

## जिल्हा परिषद सेस योजना अंतर्गत कार्यान्वित उपक्रम

१. वाचनालय उन्नतीकरण प्रकल्प.
२. प्रयोगशाळा उन्नतीकरण प्रकल्प.
३. शिक्षक प्रेरणा शिबीर.
४. गतिमान वाचन कौशल्य विकसन प्रकल्प.
५. शंकरराव मोहिते पाटील प्राथमिक शिक्षण गुणवत्ता विकास कार्यक्रम
६. ग्रामीण भागातील वाचनालयांना पुस्तके पुरविणे.
७. ग्रामीण भागातील व्यायाम शाळांना व्यायाम साहित्य पुरविणे.
८. शिक्षक समृद्धी परीक्षा,
९. विद्यार्थी प्रज्ञाशोध परीक्षा.

### वाचनालय उन्नतीकरण प्रकल्प

वाचनालय उन्नतीकरण उपक्रम प्रकल्पांतर्गत जिल्हा परिषदेच्या सर्व २८४९ शाळा नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडियाच्या अजिवन सभासद झालेले आहेत. जि.प. सेस अंतर्गत हा उपक्रम सुरू आहे.

### प्रयोगशाळा उन्नतीकरण प्रकल्प

प्रयोगशाळा उन्नतीकरण उपक्रम प्रकल्पांतर्गत जिल्हा परिषदेच्या सर्व १९९ केंद्र शाळांना टेलिस्कोप, मायक्रोस्कोप, तापमापी, मानवी हाडाचा सांगाडा प्रतिकृती इ. पुरविण्यात आलेले आहेत. जि.प. सेस अंतर्गत या उपक्रमासाठी रू. ३०.३४ लाख तरतूद करण्यात आली आहे.

### शिक्षक प्रेरणा शिबीर

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांना प्रोत्साहित करणे त्यांना स्वत्वाची जाणीव करुन देणे. सकारात्मक दृष्टीकोन विकसीत करणे. यासाठी शिक्षक प्रेरणा शिबीर आयोजित करण्यात आला. जि.प. सेस मधून या उपक्रमासाठी रू.१८०००० तरतूद करण्यात आली आहे.

### गतिमान वाचन कौशल्य विकसन प्रकल्प

या प्रकल्पांतर्गत जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांसाठी गतिमान वाचन कौशल्य उपक्रम घेण्यात येत आहेत. यासाठी रू. ८१२००० तरतूद करण्यात आली आहे.

### ग्रामीण भागातील वाचनालयांना पुस्तके पुरविणे

ग्रामीण भागातील नोंदणीकृत वाचनालयांना नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडियाची पुस्तके पुरविली जाणार आहेत. यामुळे ग्रामीण भागात वाचनासाठी पुस्तके उपलब्ध होतील. यासाठी रू. ३ लाख तरतूद करण्यात आली आहे. पुस्तकांची मागणी करण्यात आलेली आहे.

### ग्रामीण भागातील व्यायाम शाळांना व्यायाम साहित्य पुरविणे

ग्रामीण भागातील नोंदणीकृत व्यायाम शाळांना कुस्तीसाठी मॅट इ. यामुळे ग्रामीण भागात मॅटवरील कुस्तींपटूसाठी वातावरण निर्मिती होईल. यासाठी रू. १० लाख तरतूद करण्यात आली आहे. जाहीर निविदा देवून निविदा मंजूर करण्यात आलेली आहे.

## शिक्षक समृद्धी परीक्षा

- सोलापूर जिल्हयातील प्राथमिक शाळांतील शिक्षकांचे व्यावसायिक ज्ञान आजमावणे. शिक्षकांच्या अभ्यासक्रमविषयक ज्ञानाची चाचपणी करणे. शिक्षकांना त्यांच्या व्यावसायिक दर्जाची जाणीव करुन देणे. यासाठी शिक्षकांची परीक्षा घेण्यात आली.
- शिक्षकांना व्यावसायिक दर्जा कमी असल्यास सुधारण्याची संधी व प्रोत्साहन मिळाले.
- व्यावसायिक दर्जा उत्तम असलेल्या शिक्षकांचे अभिनंदन व कौतुक करुन इतर शिक्षकांना याबाबत प्रेरणा दिली. यासाठी रू. २०,००० तरतूद केली आहे.

## शिक्षक समृद्धी परीक्षा फलनिष्पत्ती

- शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग.
- परीक्षा ऐच्छीक असूनही ९७६ प्राथमिक शिक्षक उपस्थित. उपस्थिती ८८.७२%
- शिक्षकांच्या आयुष्यातील ऋण गुणदान पद्धतीची पहिलीच परीक्षा.
- ९७६ पैकी धन (+) गुण मिळविणारे शिक्षक ६७७. शेकडा प्रमाण ६९.३६
    - शून्य (०) गुण मिळविणारे शिक्षक १६. शेकडा प्रमाण १.६३
    - ऋण (-) गुण मिळविणारे शिक्षक २८३. शेकडा प्रमाण २८.९९
- इंग्लिश निबंध लेखनामध्ये शून्य (०) गुण मिळविणारे शिक्षक १४६.
- सुमारे १५% शिक्षकांना इंग्रजी लेखन करता आले नाही.
- इंग्रजी निबंध लेखनामध्ये २० पैकी १५ किंवा १५ पेक्षा जास्त गुण मिळविणारे १३ शिक्षक आहेत. शेकडा प्रमाण १.३३ इतके आहे.
- जिल्हा गुणवत्ता यादीतील प्रथम ५ शिक्षकांपैकी अक्कलकोट-२ व मंगळवेढा, बार्शी आणि माळशिरस मधील प्रत्येकी १ शिक्षकांचा समावेश आहे.

## विद्यार्थी प्रज्ञाशोध परीक्षा

- जि.प. सेस अंतर्गत विद्यार्थी प्रज्ञाशोध परीक्षेसाठी रू. १,८९,००० अनुदान मंजूर करून घेण्यात आले.
- सोलापूर जिल्हा परिषदे मार्फत इयत्ता ६ वी व ७ वी तील विद्यार्थ्यांसाठी जि.प. सेस मधून सोलापूर विद्यार्थी प्रज्ञाशोध परीक्षा दि. २८/१२/०८ रोजी एकूण २३ केंद्रावर घेण्यात आली.
- सदर परीक्षेसाठी इयत्ता ६ वी चे ४१९० व इ. ५ वी चे ४०३९ असे एकूण ८२२९ विद्यार्थी उपस्थित होते (९३.८३ टक्के)
- परीक्षेचा निकाल दि. २१/१/०९ रोजी जाहीर करण्यात आला.
- जिल्हा गुणवत्ता यादीत इयत्ता ६ वी चे ५४ विद्यार्थ्यांमध्ये ३३ मुले व २१ मुलींचा समावेश आहे.
- जिल्हा गुणवत्ता यादीत इयत्ता ७ वी चे ५० विद्यार्थ्यांमध्ये ३४ मुले व १६ मुलींचा समावेश आहे.
- इ. ६ वी व ७ वी च्या १०४ विद्यार्थ्यांच्या जिल्हा गुणवत्ता यादीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे ३६ व खाजगी प्राथमिक शाळा/ माध्यमिक शाळांचे ६८ विद्यार्थी आहेत.
- या परीक्षेत गणित, विज्ञान व इंग्रजी या तीन विषयांची काठीण्य पातळी दोन इयत्तांनी पुढे आहे.
- ही परीक्षा ऋण गुणदान पद्धतीची (Negative Marks System) घेण्यात आली. अशा पद्धतीचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी प्रथमच.
- गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना दि. १६ जून २००९ रोजी समारंभपूर्वक बक्षिस वितरण करण्यात आले.

## अग्निपंख प्रयोगशाळा

- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शाळांना मिळणाऱ्या विविध अनुदानाचा उपयोग करण्यासाठी अग्निपंख प्रयोगशाळा हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे.
- सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्व २८४९ जिल्हा परिषद शाळांमध्ये अग्निपंख प्रयोगशाळा स्थापन झाल्या आहेत.
- जि.प. सेस अंतर्गत जिल्ह्यातील १९९ केंद्र शाळांमध्ये आकाश दर्शन दुर्बिण, सुक्ष्मदर्शी यंत्र, मानवी हाडाचा सांगाडा इ. प्रयोगशाळेसाठी लागणारे साहित्य देण्यात आले.
- जिल्ह्यातील कार्यरत असलेल्या अग्निपंख प्रयोगशाळांना जि.प. सेस योजने अंतर्गत उन्नतीकरण करण्यात आले.
- शिक्षक स्वत: प्रयोगशाळेमध्ये प्रयोग करून दाखवित आहेत.
- विद्यार्थी स्वत: प्रयोग करीत आहेत.
- विद्यार्थी केलेल्या प्रयोगाची तपशीलवार नोंद प्रयोग नोंदवहीमध्ये करीत आहेत.
- अग्निपंख प्रयोगशाळेमुळे शाळांतील दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रभावी होत आहे.

## प्रज्ञाचक्षु शाळा वाचनालय रचना

विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी सोप्या पध्दतीने व विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासूवृत्ती निर्माण व्हावी या हेतूने वाचनालयाची रचना ४ स्तरावर करण्यात आलेली आहे.

स्तर १ :- प्रत्येक वर्गाचे वर्ग कोपरा वाचनालय
स्तर २ :- प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वत:चे पुस्तक.
स्तर ३ :- प्रत्येक शाळेचे फिरते वाचनालय.
स्तर ४ :- प्रत्येक शाळेचे शिक्षकांसाठी संदर्भ वाचनालय.

## *शंकरराव मोहिते पाटील प्राथमिक शिक्षण गुणवत्ता विकास अभियान वैशिष्ट्ये*

- प्राथमिक शिक्षण गुणवत्ता विकास अभियान - एक लोक चळवळ.
- तालुका निहाय मेळावे - मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तारअधिकारी यांचे उद्‌बोधनपर मेळावे
- स्तरनिहाय ( जिल्हा, तालुका, केंद्र ) जिल्हयातील सर्व शिक्षकांचे शिक्षक प्रशिक्षण.
- विशेष ग्रामसभा आयोजन, ग्राम सभेत विद्यार्थी प्रगती अहवाल सादर व अवलोकनार्थ शाळेत उपलब्ध.
- गुणवत्ता विकास अभियानात महिलांचा विशेष सहभाग- महिला लोक प्रतिनिधी मेळावे.
- जल साक्षरता व पर्यावरण संवर्धन.
- लोक सहभागातून ( संस्था, पदाधिकारी, कर्मचारी इ. ) कायम स्वरुपी पारितोषिक योजना कार्यान्वित करणारा महाराष्ट्रातील पहिला व एकमेव जिल्हा .

## *शंकरराव मोहिते पाटील प्राथमिक शिक्षण गुणवत्ता विकास अभियान पारितोषिक योजना*

- गुणवत्ता विकास अभियान सातत्याने चालू राहणेसाठी कायमस्वरूपी निधी ठेव योजना
- निधी संकलनाचे उद्दिष्ट रू १.२५ कोटी .
- जिल्हा परिषद पदाधिकारी , अधिकारी , कर्मचारी व शिक्षक यांचे निधी संकलनात स्वेच्छा योगदान .
- जिल्ह्यातील सहकारी व स्वयंसेवी संस्था यांचा निधी संकलनात उस्फूर्त सहभाग .

- जिल्हा व तालुका स्तरावर सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनाद्वारे निधी संकलन .
- जमा निधीपैकी रू ६५ लाख रू कायम ठेव योजनेत गुंतवणूक .
- कायम ठेव योजनेतून मिळणा-या व्याजावर पारितोषिक योजनेचे आयोजन.
- स्वेच्छा निधी संकलन, कायम ठेव योजनेत गुंतवणूक व गुंतवणूकीच्या व्याजावर पारितोषिक योजनेचे आयोजन करणारा सोलापूर हा राज्यातील एकमेव जिल्हा.

## शंकरराव मोहिते पाटील प्राथमिक शिक्षण गुणवत्ता विकास अभियान बाहयमूल्यमापन समिती अभिप्राय

- तरंग वाचनालय, कोपरा वाचनालय हा उपक्रम स्तुत्य.
- अभियानाबाबत शिक्षकांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन आढळला.
- शाळेत कार्यानुभव विषयांतर्गत विविध वस्तुनिर्मितीचे उपक्रम चांगल्या पध्दतीने अंमलात आणले.
- अभियानामुळे शिक्षक, माता पालक व ग्रामस्थ यांचेमध्ये 'मुलांनी शिकावे, शिकलं पाहिजे' ही जाणीव निर्माण झाली.
- गुणवत्ता विकास अभियान कायम स्वरुपी कार्यान्वित राहण्यासाठी कायम ठेव योजनेत रु. ६५ लाख जमा निधी ही बाब उल्लेखनीय आहे.